**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ०३/२०२४</u>**
**<u>(प्रकाश आणि एक वि. शरद आणि वगैरे)</u>**

## <u>निशाणी क्र. ०५ खालील आदेश</u>
*<u>(दिनांक १२.०२.२०२४)</u>*

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरोधात तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला.

**<u>वादी यांचे कथन खालीलप्रमाणे –</u>**

२. वादीच्या कथनाप्रमाणे, नागराळे येथील वाद मिळकत सि.स.नं. ४०३ क्षेत्र ८२.८० चौ.मी. हा बोळाचा येणेजाणेचा सामाईक रस्त्यासाठी राखीव ठेवला असून सदर बोळाचा रस्ता हा ते व इतर सहहिस्सेदार यांना येणेजाणेसाठीचा आहे. सदर बोळाचा रस्ता हा मुळ रस्त्याच्या पुर्वेला सुमारे ४५ फुट पुर्व पश्चिम लांबीचा असून रुंदी ५ फुट आहे. बोळाचा रस्ता हा सि.स.नं. ४०५ व ४०४ चे दक्षिणेला असून त्याची रुंदी ५ फुअ आहे तसेच रस्त्याच्या पुर्वेला बोळाचा रस्ता जाूवन पुढे उत्तरेला सि.स.नं. ४०९ पर्यंत गेला आहे. वाद मिळकत ही तुकाराम जाधव यांचे वडील शिवा उर्फ शिवाजी जाधव, दत्तू जाधव, शामु जाधव आणि भास्कर जाधव यांची सामाईक मालकी हक्क कब्जेवहिवाटीची बोळाच्या रस्त्यासाठी सोडलेली मिळकत आहे. सदरची मिळकत ही सुमारे ५० ते ६० वर्षापासून सि.स.नं. ४०५, ४०४, ४०६, ४०७, ४०८ व ४०९ मधील हिस्सेदार यांना येणेजाणेसाठी बोळाचा रस्ता सोडलेला असून ते त्या रस्त्यातून वहिवाट करत आहेत. तसेच मुख्य रस्त्याचे पुर्वेकउील सि.स.नं. ४०३ चे ईशान्य कोप–ल्यात म्हणजे सि.स.नं. ४०५ चे वायव्य कोप–या सार्वजानिक ताईबाई देवीचे मंदिर आहे. सि.स.नं. ४०४ व ४०५ ही मूळची भास्कर जाधव यांची मिळकत दि. १६.१०.२०२३ रोजी खरेदी दस्त क्र. ३९१८/२०२३ ने प्रतिवादी क्र. १ व २ यांना विक्री केली आहे. सि.स.नं. ४०५ च्या दक्षिणेला व सि.स.नं. ४०४ चे दक्षिण व पुर्वेला सि.स.नं. ४०३ ची मिळकत आहे. त्यामध्ये प्रतिवादी यांचा कोणताही संबंध नाही. बोळाचे रस्त्याचे वादी, प्रतिवादी आणि इतर सह हिस्सेदार ये–जा करत होते परंतु, प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र. ३ कडून घेतलेल्या खरेदी

दस्तास जाणून बुजून चुकीच्या चतुःसिमा नमूद करुन बेकायदेशीर व बोगस खरेदी दस्त बनवला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी खरेदी घेतलेल्या मिळकत क्र. ४०४ व ४०५ चे दक्षिणेला सि.स.नं. ४०३ म्हणजे दावा मिळकत आहे परंतु, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी खरेदी दस्तामध्ये दक्षिणेला व पुर्वेला चुकीचे चतुःसिमेची नोंद करुन दस्त बनवला आहे. वास्तविक सरोजनी जाधव यांचा सि.स.नं. ४०२ व विष्णू भैरव जलसिंचन योजन ऑफीस यांचा सि.स.नं. ४०१ आहे. सदर चुकीच्या नोंदीच्या आधारे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी बेकायदेशीररित्या बांधकाम करुन त्यावर सिमेंटरचे पिलर उभे करण्याच्या प्रयत्नात आहेत व सि.स.नं. ४०४ व ४०५ चे दक्षिणेचा सि.स.नं. ४०३ या बोळाच्या रस्त्यावर पुर्णपणे अतिक्रमण करुन संपूर्ण पुर्व पश्चिम चालीचा बोळाचा रस्ता बंद करुन बांधकाम करणेस सुरुवात केली आहे. वादी व इतर सह हिस्सेदार यांना मुख्य रस्त्यापासून घराकडे येणेजाणेसाठी म्हणजे सि.स.नं. ४०६, ४०७, ४०८, ४०९ व ४०२ चे घरमिळकतीमध्ये येणेजाणे पूर्ण बंद झाले आहे. वादी यांचे सि.स.नं. ४०७ व ४०२ मध्ये राहते घर आहे. बेकायदेशीर बांधकाम केल्यानंतर वादीने प्रतिवादींविरुध्द पलूस पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज क्र. ३३९/२०२३ ने तक्रार दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादी यांच्या गैरकृत्यामुळे वादीस व इतर सहहिस्सेदारास येणेजाणेचा रस्ताच राहणार नाही. करिता, प्रतिवादी यांनी स्वतः, नोकर, चाकर, एजंट इसम यांनी सि.स.नं. ४०३ च्या सामाईक बोळाच्या रस्त्यावर अतिक्रमण करुन वादी यांच्या येणे–जाणेच्या रस्त्यास हरकत अडथळा करु नये, अशी तुर्तातूर्त ताकीद देण्याची वादीने विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. २५ वर दाखल करुन वादीच्या प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध दर्शवला. वादीच्या दाव्यातील सर्व मजकुर हा खोटा, बनावट असून त्यातील मागणी ही लबाडीची, काल्पनिक असल्यामुळे ते त्यांना मान्य व कबुल नाहीत. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, सि.स.नं. ४०३ हे क्षेत्र खुल्या जागेचे तसेच बोळाचे, रस्त्याचे असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी वादीने दाखल केलेला नाही. सदरचे क्षेत्र हे बोळाचे अगर रस्त्याचे कधीही नव्हते. सि.स.नं. ४०३ च्या उता–याचे अवलोकन केले असता, सदर मिळकत ही बोळाचा येणे जाणेचा सामाईक रस्त्यासाठी ठेवली आहे, असा

मजकुर सदर उता–यावर कुठेही नमूद नाही. सदर मिळकत कधीही बोळ अगर रस्ता म्हणून अस्तित्वात नव्हता. सि.स.नं. ४०४, ४०५, ४०६, ४०७, ४०८ व ४०९ मधील हिस्सेदारांना येणे जाणेसाठी फार पुर्वीपासून पश्चिम दिशेला मोठा सिमेंट कॉक्रींटचा रस्ता आहे व त्यामुळे त्या मिळकतीसाठी बोळ निर्माण होण्याचे मूळात कारणच उपस्थित झाले नव्हते. तसेच वादी कथन करत असल्याप्रमाणे ताईबाईचे मंदिर हे मुख्य रस्त्यालगत आहे व त्यामुळे देखील त्या मंदिरात जाण्यासाठी बोळ असण्याचा प्रश्नच येत नाही. वादी हे जाणीवपुर्वक आपल्या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांच्याकडून सि.स.नं. ४०४ व ४०५ ही मिळकत दि. १६.१०.२०२३ रोजीच्या नोंद खरेदी दस्त क्र. ३९९८/२०२३ ने खरेदी केल्याचे अपुरे व चुकीचे कथन करत आहे. खरेदी दस्त क्र. ३९९८/२०२३ मध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांच्याकडून सि.स.नं. ४०५ मधील प्रतिवादी क्र. ३ यांचा ७.८६६ चौ.मी. चा संपूर्ण हिस्सा, सि.स.नं. ४०४ मधील प्रतिवादी क्र. ३ यांचा ७.३३३ चौ.मी. चा संपूर्ण हिस्सा आणि सि.स.नं. ४०३ मधील प्रतिवादी क्र. ३ यांचा ११.८३ चौ.मी. चा संपूर्ण हिस्सा या खरेदी दस्ताने घेतल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे सि.स.नं. ४०४, ४०५ व ४०३ या मिळक्तीचे व नोंद खरेदी दस्ताने प्रतिवादी क्र. १ व २ हे मालक झालेले आहे व तशी सिटी सर्वे रेकॉर्ड सदरी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाची नोंद दि. ०३.११.२०२३ रोजी फेरफार क्र. ३३२ ने करण्यात आलेली आहे. सदर खरेदीपत्र आणि रेकॉर्ड सदरी झालेल्या नोंदीबाबत प्रतिवादी क्र. ३ किंवा वादी यांनी कधीही तक्रार केलेली नाही. सि.स.नं. ४०३ मध्ये असणा–या हिश्याबाबत स्वतंत्र आणेवारी स्पष्टपणे नमूद केलेली आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व२ यांचे नावे सि.स.नं. ४०३ मध्ये प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे ५.९१ चौ.मी. व प्रतिवादी यांच्या नावे ५.९२ चौ.मी. असे स्वतंत्र क्षेत्राची नोंद आणेवारीने करण्यात आल्याचे आणि वादी यांचे क्षेत्रासही स्वतंत्र नोंद करण्यात आल्याचे स्पष्ट दिसत आहे. जर वादी कथन करतो त्याप्रमाणे तथाकथित बोळ/रस्ता असता तर सदर मिळकतीमध्ये आणेवारी लावता आली नसती. त्यामुळे सदर मिळकतीमधील सहहिस्सेदार यांचे प्रत्येकाच्या हिश्याप्रमाणे वैयक्तीक मालकी वहिवाटीचे मिळकत असल्याचे स्पष्ट होत आहे. वादीने दाखल केलेल्या कच्चा हातनकाशा व सिटी सर्वे

नकाशा पाहीला असता सि.स.नं. ४०४, ४०५, ४०६, ४०७, ४०८ व ४०९ या सर्व मिळकतींना मिळकतीलगत पश्चिम बाजुकडे सिमेंट कॉक्रींटचा मोठा रस्ता असल्याचे स्पष्ट दिसून येते. तथापि, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सि.स.नं. ४०४, ४०५ व ४०३ ची मिळकत नोंद खरेदी दस्ताने केल्यानंतर त्यांनी लाखो रुपये खर्च करुन त्यावर ७० टक्के बांधकाम पूर्ण केल्यानंतर जाणीवपुर्वक वादीने खोटा दावा दाखल केला असून प्रतिवादी क्र. १ व २ यांना राहणेस इतर दुसरे कोणीतीही मिळकत नाही आणि सदर बांधकामास स्थगिती दिल्यास प्रतिवादी क्र. १ व २ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादी यांनी वाद मिळकत ही बोळ असल्याबाबत कोणतेही सकृतदर्शनी पुरावा दाखल केलेला नाही. करिता, सदरची केस ही सकृतदर्शनी वादीच्या बाजूने नाही. तसेच वादीचा सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसार होणार नाही याउलट वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांना त्यांच्या कायदेशीर हक्कास मुकावे लागेल व प्रतिवादीचे पैशाने भरुन न येणारे अपरिमित नुकसान होईल. सरतेशेवटी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीचा तात्पुरत्या मनाईचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. उभयपक्षाचे कथन वाचले. कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे विधिज्ञ श्री. वाय. जे. चेंडगे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एच. आर. गायकवाड यांचा युक्तिवाद ऐकला.

५. खालील मुददे माझ्या विचाराधीन आहेत व त्यावर मी माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमर्शनी दावा वादीच्या बाजूच्या असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे त्याने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे असे नुकसान होईल, हे वादीने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

६. वादी यांनी, निशाणी क्र. ३ वरील क्र. ३/१ वर नागराळे येथील मालमत्ता क्र. २६ चा उतारा, क्र. ३/२ वर नागराळे येथील नगर भुमापन क्र. ४०३ चा मालमत्ता पत्रक उतारा, क्र. ३/३ वर नागराळे येथील नगर भुमापन क्र. ४०२ चा मालमत्ता पत्रक उतारा, क्र. ३/४ वर नागराळे येथील नगर भुमापन क्र. ४०४ चा मालमत्ता पत्रक उतारा, क्र. ३/५ वर नागराळे येथील नगर भुमापन क्र. ४०७ चा मालमत्ता पत्रक उतारा, क्र. ३/६ वर नागराळे येथील नगर भुमापन क्र. ४०५ चा मालमत्ता पत्रक उतारा, क्र. ३/७ वर नागराळे येथील सि.स.नं. ४०३ चा भुमिअभिलेख, पलूस यांचा मोजणीनकाशा, क्र. ३/८ वर नागराळे येथील सि.स.नं. ४०१ ते ४०९ चा भुमिअभिलेख, पलूस यांचा मोजणीनकाशा, क्र. ३/९ वर बांधकामाचे फोटो, क्र. ३/१० वर वादी यांनी प्रतिवादींचेविरुध्द दाखल केलेली गु.र.क्र. ३३९/२०२३ ची तक्रार प्रत, क्र. ३/११ वर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांना दि.१६.१०.२०२३ रोजीचे दिलेले खुषखरेदी पत्र, निशाणी क्र. २९ सोबत दाखल केलेले ४ फोटो, निशाणी क्र. १४ सोबत दाखल केलेले २ फोटो यावर वादीने भिस्त ठेवली. याउलट प्रतिवादीने निशाणी क्र. १९ सोबत प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाखल केलेले नामदेव तुकाराम जाधव, रमेश दत्तात्रय जाधव आणि अनिता विजय पाटी यांचे शपथपत्र, निशाणी क्र. २४ सोबत दाखल केलेला १ फोटो आणि निशाणी क्र. २९ सोबत सि.स.नं. ४०३ ते ४०९ चे उतारे आणि फोटो यावर प्रतिवादीने भिस्त ठेवली.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत –</u>**

७. सदरचे तिन्ही मुददे एकमेकांशी संलग्न असल्याने विवेचनाची पूनरावृत्ती टाळण्याकरिता हे तिन्ही मुददे चर्चेकरिता एकत्रीत घेण्यात आलेले आहेत.

८.		वादीने सदरचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, सि.स.नं. ४०३ ही वादमिळकत असून ती एक बोळ आहे. सदरची बोळ ही सामाईक मालकी हक्क कब्जेवहिवाटीची आहे. वादमिळकत ही तुकाराम दत्तू जाधव, वादीचे वडील शिवा उर्फ शिवाजी जाधव, दत्तू धोंडी जाधव, शामु धोंडी जाधव व भास्कर भिमु जाधव यांच्या सामाईक मालकीची हक्क, कब्जेवहिवाटीची बोळाच्या रस्त्यासाठी सोडलेली मिळकत आहे. सदरची दावा मिळकत आजही रेकॉर्डला सामाईकात नोंद आहे. वाद मिळकत ही सुमारे ५० ते ६० वर्षापासून सि.स.नं. ४०५, ४०४, ४०६, ४०८ आणि ४०९ मधील सह हिस्सेदार यांना येण्याजाण्यासाठी सोडलेला आहे व त्या ठिकाणी पुर्वीपासून वादी नमूद सह हिस्सेदार हे येणे जाणे करतात. तसेच मुख्य रस्त्याच्या पुर्वेकडील सि.स.नं. ४०३ चे ईशान्य कोप–यात सि.स.नं. ४०५ चे वायव्य कोप–यात सार्वजानिक ताईबाईचे मंदिर आहे. याउलट प्रतिवादीचे असे कथन आहे की, सि.स.नं. ४०३ मधील प्रतिवादी क्र. ३ यांचा असलेला ११.८३ चौ.मी. संपूर्ण हिस्सा हा प्रतिवादी क्र. १ व २ यांनी खरेदीने घेतलेला आहे. सि.स.नं. ४०४, ४०५, ४०६, ४०७, ४०८ आणि ४०९ मधील हिस्सेदारांना येण्याजाण्यासाठी फार पुर्वीपासून पश्चिम दिशेला सिमेंटचा कॉक्रीटचा रस्ता आहे व त्यामुळे सि.स.नं. ४०३ मध्ये कोणताही बोळ नाही.

९.		सि.स.नं. ४०३ च्या उता–याचे अवलोकन केले असता वादी क्र. १ यांच्या वडीलांचे नाव सामाईक क्षेत्रामध्ये नमूद आहे. वादी यांचे नाव सदर मालमत्ता पत्रकामध्ये कुठेही दिसून येत नाही आणि त्यामध्ये सामाईक बोळ आहे याबाबत कुठेही उल्लेख नाही. वादीने दाखल केलेला सि.स.नं. ४०३ आणि सि.स.नं. ४०१ ते ४०९ चा गटनकाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सि.स.नं. ४०३ ही खुली जागा आहे. त्यामध्ये कोणताही सामाईक बोळ किंवा रस्त्याचा उल्लेख नाही. वादी यांनी वाद मिळकत क्र. ४०३ ही सामाईक बोळ आहे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावरती आणलेला नाही.

१०.		पुढे असे आहे की, वादीच्या कथनानुसार त्यांना पश्चिम दिशेला असलेल्या मूळ रस्त्यावर येण्यासाठी बोळा व्यतिरिक्त दुसरा कोणताही रस्ता नाही. वादीने दाखल केलेले

सि.स.नं. ४०१ ते ४०९ चे गट नकाशाचे अवलोकन केले असता, त्यांना पश्चिमेकडून रस्ता असल्याचे दिसून येते. सि.स.नं. ४०६, ४०७, ४०८ व ४०९ यांना सुध्दा पश्चिमेकडून रस्ता असल्याचे दिसून येते.

**११.** पुढे असे आहे की, वादी यांचा सि.स.नं. ४०७ या मिळकतीमध्ये त्यांच्यामध्ये व त्यांच्या भावामध्ये वाटणी झालेली आहे. वादी सि.स.नं. ४०७ मधील पुर्वेकडील क्षेत्र त्यांना वाटणीने मिळालेली आहे आणि पश्चिमेकडील क्षेत्र हे त्यांचा भाउ प्रताप शिवाजी उर्फ शिवा जाधव याने ठेवलेला आहे. त्यामुळे वादी यांना मुख्य रस्त्याला येण्यासाठी बोळाशिवाय कोणताही अन्य रस्ता नाही परंतु, सदरचे वरील कथन हे वादीने त्यांच्या दाव्यामध्ये नमूद केलेले नाही. तसेच त्यांच्या दोघांमध्ये वाटणी झाले किंवा कसे याबाबत कोणताही दस्त अभिलेखावरती वादीने दाखल केलेला नाही. त्यामुळे वादीमध्ये व त्याच्या भावामध्ये वाटणी झाली किंवा कसे ही बाब स्पष्ट होत नाही.

**१२.** पुढे वादीचे असे कथन आहे की, सि.स.नं. ४०५, ४०४, ४०६, ४०७, ४०८, ४०९ मधील हिस्सेदारांना येण्यासाठी सि.स.नं. ४०३ हा बोळाचा रस्ता सोडलेला आहे. सि.स.नं. ४०५, ४०४ हा प्रतिवादी क्र. १ व २ यांचा आहे. सि.स.नं. ४०६, ४०८ आणि ४०९ हे जे हिस्सेदार आहेत यांनी सदर दाव्यामध्ये शपथपत्र दाखल करुन त्यांनी असे कथन केले की, सि.स.नं. ४०३ मध्ये पुर्वीपासून कोणताही सामाईक बोळ नव्हता. त्यांनी पुढे असेही कथन केले की, ते वहिवाटीसाठी त्यांच्या मिळकतीच्या पश्चिमबाजूला मुख्य रस्ता असून सदर मुख्य रस्त्यावरुन ते वहिवाट करतात.

**१३.** पुढे असे आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांनी सदर दाव्यामध्ये लेखी कैफियत देवून त्यांनी असे कथन केले की, सि.स.नं. ४०३ हा सामाईकाचा बोळाचा रस्ता आहे परंतु, प्रतिवादी क्र. १ यांनी सि.स.नं. ४०३ मधील मिळकत प्रतिवादी क्र. १ व २ यांना दिलेली आहे व त्यामध्ये असे कुठेही नमूद नाही की, सि.स.नं. ४०३ मध्ये सामाईक बोळाचा रस्ता आहे.

त्यामुळे फक्त त्यांच्या तोंडी पुराव्यावरुन म्हणता येणार नाही की, सि.स.नं. ४०३ मध्ये सामाईक बोळ आहे. तसेच वादी यांचा भाउ प्रताप शिवाजी उर्फ शिवा जाधव यांनी सुध्दा सदर दाव्यामध्ये त्यांचे शपथपत्र दाखल करुन असे कथन केले की, सि.स.नं. ४०३ मध्ये सामाईक बोळाचा रस्ता आहे. परंतु, त्यांच्या तोंडी पुराव्याशिवाय सि.स.नं. ४०३ मध्ये सामाईक बोळ असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**१४.** पुढे असे आहे की, सदर वादमिळकत सि.स.नं. ४०३ हा सामाईक बोळाचा रस्ता असता तर निश्चितच सि.स.नं. ४०६, ४०८ आणि ४०९ या धारकांनी तक्रार किंवा दावा दाखल केला असता. परंतु, आजअखेर सदर धारकांनी कोणतीही तक्रार किंवा दावा दाखल केलेला नाही.

**१५.** पुढे असे आहे की, सि.स.नं. ४०२ च्या धारकाने सदर दाव्यामध्ये शपथपत्र दाखल केले आहे. परंतु, सि.स.नं. ४०२ चा धारक याचा सदर मिळकतीमध्ये कोणताही संबंध दिसून येत नाही. वादीने जे दोन प्रमाणित गटाचे नकाशे दाखल केलेले आहेत त्यामध्ये सि.स.नं. ४०२ च्या धारकाच्या मिळकतीचा कुठेही उल्लेख नाही तसेच सि.स.नं. ४०२ ही कोणत्या ठिकाणी आहे याचा उल्लेख नाही.

**१६.** पुढे असे आहे की, प्रतिवादीने दाखल केलेले फोटोंचे अवलोकन केले असता वादीने जे त्याच्या दाव्यामध्ये ताईबाई देवीचे मंदिर आहे ते मंदिर पश्चिम बाजूला जो सरकारी रस्ता आहे त्याला लागूनच दक्षिण बाजूला असल्याचे दिसून येते. त्यामुळे तिथे जाण्यासाठी पर्यायी रस्ता असल्याचे देखील दिसून येते. पुढे असे आहे की, सि.स.नं. ४०३ मध्ये वादी यांचे वडील, प्रतिवादी क्र. १ व २ आणि बाकीचे सहहिस्सेदार यांची नावे आहेत. त्यामुळे कायदयाने सहहिस्सेदार यांच्या विरोधात मनाई हुकूम मागता येणार नाही.

**१७.** पुढे असे आहे की, प्रतिवादी यांनी बांधकामासंदर्भात काही फोटो दाखल केलेले आहेत. सदर फोटोचे अवलोकन केले असता, बांधकाम हे लेन्टींल पर्यंत झाल्याचे

दिसून येते. त्यामुळे सदरचे बांधकाम थांबवल्यास प्रतिवादी यांचे कुठेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. अशा परिस्थितीत मी या निष्कर्षाप्रती येतो की, वादीचे त्याचे वादकथन सकृतदर्शनी सिध्द केलेले नाही. न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने जात नाही. परिणामी, वादीने मागणी केल्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश प्रतिवादींविरुध्द पारित करता येणार नाही. तसा मनाई हुकूमाचा आदेश वादीच्या हक्कात पारीत न केल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. जर सदरचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीने कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे.

**१८.** उपरोक्त चर्चेवरुन व अभिलेखावरुन मी या निष्कर्षाप्रत येतो की, वादीने मुददे क्र. १ ते ३ सिध्द न केल्यामुळे मुददा क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवत आहे. करिता, मुददा क्र. ४ चे उत्तर मी खालीलप्रमाणे पारित करीत आहे.

## आ दे श

निशाणी क्र. ०५ खालील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/-
(पी. बी. भरपुरे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पलूस.

पलूस.
दिनांक १२.०२.२०२४.

**(Uploaded without Digital Signature as it is expired)**